जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 28/20
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 14.12.2020

**दिनांक 16.12.2020 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपाकेच्या सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**
**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.241/नवि-24 दिनांक 02.12.2020 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मंजुर सुधारीत विकास योजने प्रमाणे सेक्टर डी मधील प्रस्तावित आरक्षण क्रं. 5,11,12,13,14,15,16,19,20,21,22,23,24,25 या ठिकाणच्या आरक्षणामध्ये कच्ची व पक्की बांधकामे झालेली आहेत त्यामुळे सदर ठिकाणच्या आरक्षणानुसार अमलबजावणी करणे शक्य नसल्यामुळे सदरची आरक्षणे ही सर्वे नं. 158,162 चा भाग व मौजे ब्रम्हपुरी भागात आरक्षण ठेवणे. तसेच महानगरपालिका हद्यीतील सेक्टर G मधील सर्व्हे नं. 32,34,35 व 37 मध्ये असलेल्या आरक्षणाऐवजी सर्व्हे नं. 31 व 33 मधील मोकळया जागेत व सर्व्हे नं. 32 व 42 मधील शिल्लक मोकळया जागेत आरक्षण स्थलांतरीत करण्याचा नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव 132 दिनांक 30.11.18 समंत केला आहे.

तथापि त्यामुळे मनपाकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेल्या ठराव क्रं. 132 नुसार मौजे ब्रम्हपुरी गावात सेक्टर डी मधील 16 आरक्षणे स्थलांतरीत करणे शक्य होणार नसल्याचे तसेच सेक्टर डी मधील लोकसंख्येसाठी आवश्यक असणारी आरक्षणे वगहल्यास नियोजनाच्या दृष्टीकोणातुन सार्वजनिक सुविधांचा अभाव निर्माण होणार असल्यामुळे सदर ठराव विखंडीत करण्याची विनंती आयुक्त मनपा नांदेड यांनी दिनांक 22.01.19 च्या पत्रान्वये शासनास केली आहे.

त्यानुसार **शासन निर्णय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपािलकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 132 दिनांक 30.11.18 हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत तसेच व्यापक लोकहिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 (1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबीत करण्यात येत आहे सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधीतांनी अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे **त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 02**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये सेक्टर – F मधील स.क्रं. 23 मोजे नांदेड येथे अंदाजे 1.776 हे. (विकास योजना नकाशावरील मोजमापानुसार) जागेवर F-36/EP-25 – Municipal Corporation Office and Shopping Centre चे आरक्षण दर्शविलेले असुन जागेचे समुचीत प्राधिकरण नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आहे. सदर जागेवर तहसील कार्यालय प्रशासकिय इमारत बांधकाम झालेले असुन (1) सह जिल्हा निबंधक वर्ग-1, नांदेड (2) One Stop Centre (3) राष्ट्रीय सांख्यिकी उपविभागीय कार्यालय हे तिन्ही शासकीय कार्यालय असल्याने व या तिन्ही कार्यायाकडून मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना प्राप्त झालेल्या जागा मागणीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर आरक्षणात फरबदल करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी सुचीत केले आहे. त्यानुसार मंजुर सुधारित विकास योजनेमध्ये दर्शविण्यात आलेले F-36/EP-25 – Municipal Corporation Office and Shopping Centre चे आरक्षण वगळुन सार्वजनिक निम सार्वजनिक वापरात समाविष्ट करण्यासाठी विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची आवश्यक्ता आहे.

सदरील किरकोळ फेरबदलाच्या प्रस्तावा संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासाठी सर्वसाधारण सभेची ठराव पारीत करुन त्या संबंधीतची अधिसुचना प्रसिध्द करणे तसेच हरकती व सुचना घेऊन उक्त फेरबदल करणेसाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 03**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड क्षेत्राची हद्दवाढ करणे बाबत

मुळ नांदेड नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये मौ. असदुल्लाबाद, मौ. वजिराबाद, मौ. नांदेड, मौ. सांगवी (भागाशः), मौ. ब्रम्हपुरी (भागशः) भाग सामाविष्ट होता तदनंतर दिनांक 26 मार्च 1997 च्या अधिसुचनेव्दारे शासनाने तत्कालीन नांदेड नगरपरिषद व वाघाळा नगर परिषदेचे क्षेत्र बंद करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका या नावाने ओळखण्यात येणारी महानगरपालिका असल्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार मौ. सांगवीचा उर्वरीत भाग, मौ. जंगमवाडीचा उर्वरीत भाग, मौ. म्हाळजा, मौ. वसरणी, मौ. रहीमपूर, मौ. वाघाळा, मौ. आसदवन, मौ. फत्तेजंगपुर, मौ. आसरजन, मौ. कौठा ही गावे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हृददीत समाविष्ट केले आहेत.

तदनंतर शासनाने दिनांक 01 जुलै 2009 च्या अधिसुचनेव्दारे मौ. तरोडा (खुर्द) व मौ. तरोडा (बुर्दूक) ही संपूर्ण महसुली गांवे तसेच दिनांक 20 ऑगस्ट 2009 च्या अधिसुचनेव्दारे मौ. ब्रम्हपुरीचा उर्वरीत भाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट केलेले आहेत.

सदयस्थितीत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या परिसरात क्षेत्रामध्ये झपाटयाने होत असलेली वाढ, वाढती लोकसंख्या व विकास विचारात घेता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची हद्दवाढ करणे आवश्यक आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दवाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम-3 उपकलम (3) अन्वये कार्यान्वीत होऊ शकतो. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या परिसरात क्षेत्रातील महसुली गांवे नव्याने महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करणेसाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वकख चर्चा होऊन महानगरपालिकेच्या हद्दवाढी बाबत निर्णय घेणेसाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेच्या समोर सादर.

**विषय क्रं. 04**

**विषय :-** प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र, नांदेड करिता आपत्ती विषयक साधन सामग्री खरेदी करिता प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हे हिंगोली, नांदेड व परभणी जिल्हयांच्या नागरी केंद्राकरिता प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र म्हणुन शासनाने दिनांक 25.07.2020 च्या शासन निर्णयाव्दारे मान्यता दिलेली आहे. सदरील केंद्रामार्फत आजपर्यंत तिन्ही जिल्हयांच्या नगरपालिकांमध्ये आपत्ती व्यवस्थापन, शोध व सुटका, प्रथमोपचार इत्यादी विविध प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेऊन आपत्ती विषयक बळकटीकरण करण्याचे काम करण्यात आलेले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा विचार करता शहरामध्ये वाढते नपागरीकरण, भविष्यातील महापालिकेची हद्दवाढ, जुन्या गावठान शहराची दाट वस्ती इत्यादी बाबींचा विचार करता शहरात अस्तित्वात असलेल्या स्टेडियम परिसरातील अग्निशमन केंद्रा व्यतिरिक्त जुन्या शहरामध्ये सुध्दा एक केंद्र उभारण्याची अत्यंत आवश्यक्ता आहे. सदरील केंद्र कार्यान्वीत करणेकरिता आपत्ती विषयक खालील प्रमाणे साधन सामग्रीची आवश्यक्ता आहे. वाढीव केंद्र कार्यान्वीत झाल्यास आपत्ती प्रसंगी RESPONSE TIME कमी होऊन जिवित व वित्त हानी कमी करण्यास भविष्यात मदत होईल.

| अ.क्र. | साधन सामग्रीचा प्रकार | संख्या | किमंत (कोटी मध्ये) |
|---|---|---|---|
| 01 | Quick response vehicle (QRV) | 01 | 1.40 |
| 02 | Fire Tender (4500 Ltr क्षमता) | 01 | 1.20 |
| 03 | Fiber Boat (10 Seater) | 01 | 0.10 |
| 04 | Rubber Boat (08 Seater) | 01 | 0.05 |
| | **एकूण** | | **2.75** |

उपरोक्त साहित्य शासनाकडून मागणी करण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील जुन्या नांदेड शहरातील प्रभाग क्रमांक 14 येथील नावघाट पुला पासुन ते संगतसाहेब गुरुव्दारा (मरघाट) पर्यंत हा रस्ता व घाटाचे सुशोभिकरण करण्यासाठी त्याचा आराखडा (डी.पी.आर) तयार करुन विकसीत करण्यासाठी शासनास शिफारस करुन निधी प्राप्त करुन घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- शबाना बेगम मो. नासेर **अनुमोदक** :- अ. लतीफ अ. मजीद

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा मध्ये जन्म व मृत्यु नोंदणी करिता एका उर्दु भाषीक कर्मचारी / अधिकारीची नेमणूक करणे तसेच जन्म नोंदणीचे प्रकरण लवकरात लवकर हाताळण्या करिता अधिक कर्मचारी वर्गाची नेमणुक करणे बाबत.

किती प्रकरणे आज तारखे पर्यंत प्रलंबीत आहे याची माहिती सभेसमोर ठेवणे जन्म मृत्यु विभागा मध्ये काम करणारे सर्व कर्मचा-यांची कार्यशाळा आयोजीत करुन कायदयाचे पुरेपुर ज्ञान देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः-** अ. फईम अ. मुनीर **अनुमोदकः-** अ. शमीम अब्दुल्ला

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

संपूर्ण जगात, देशात, राज्यात तसेच नांदेड शहरात सध्या कोरोना विषाणुचा उद्रेक मोठया स्तरावर होत आहे त्यामुळे कोरोना विषाणुचा (Covid-19) ची साथ झापाटयाने वाढत असल्याने या आजारामुळे शहरातील अनेक नागरीकांचे मृत्यु पावल्यास त्यांचे नातेवाईकांकडून अंतीमसंस्कार करण्यास भिती वाटत आहे.

सदरच्या साथीमुळे मृत्यु पावलेल्या हिंदु अथवा मुस्लीम समाजांच्या नागरीकांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांचे रितीरिवाजा प्रमाणे अंतीमसंस्कार शहरातील HAPPY CLUB यांच्याकडून माणुसकीच्या दृष्टीकोणातुन करण्याचे काम मागील 4-5 महिण्यापासुन चालु आहे. सदरचे काम HAPPY CLUB यांच्याकडुन चांगला काम करीत असल्याने एका खाजगी मराठी बातम्यात कौतुक करण्यात आलेले आहे.

करिता कोरोना विषाणुचा (Covid-19) ची साथमुळे मृत्यु पावलेल्या नागरीकांचे अंतीम संस्कार करणारे HAPPY CLUB यांचेकडुन करण्यात येणारे काम हे कौतुकस्पद असल्यामुळे त्यांच्या टिमचे सत्कार महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- अब्दुल शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक**:- अ.लतीफ अ.मजीद, अ. रशीद अ. गणी, शबाना बेगम मो. नासेर, अब्दुल हफीज अब्दुल करीम, सय्यद शोएब स. मजहर हुसेन

**प्रशासकिय अहवाल**

संपूर्ण जगात, देशात, राज्यात तसेच नांदेड शहरात सद्या कोरोना कोविड-19 विषाणुचा मोठया प्रमाणात प्रादुर्भावामुळे विष्णुपूरी येथील शासकीय रुग्णालय व शहरातील विविध हॉस्पीटलमध्ये कोविड-19 या महामारीच्या परिस्थितीमध्ये मृत्यु पावलेल्या मृतदेहची हताळण्याबाबत महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-2020/प्र.क्र.124/आरोग्य3अ, दिनांक 12 मे 2020 रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन परिपत्रकात नमुद मार्गदर्शक हॅप्पी क्लब नांदेड यांना जा.क्रं. नावाशमनपा/स्ववि/484/2020 दिनांक 04.05.2020 रोजीच्या पत्रान्वये कोरोना विषाणुमुळे मृत्यु झालेल्या प्रेत शहरातील स्मशानभुमि / कब्रस्तान येथे शासन निर्देशानुसार विनामुल्य योग्य प्रकारे प्रेताची विल्हेवाट लावण्यास परवानगी देण्यात आलेला आहे.

हॅप्पी क्लब यांना मनपाकेच्या वतीने आवश्यक सुरक्षा साहित्य जसे की PPE KIT फेश शिल्ड, चष्मे, मास्क व हॅन्डग्लोज इत्यादी मोफत पुरविण्यात आले आहे संबंधीत संस्थेतील सदस्य यांनी दिवसा, रात्री, बेरात्री कोवीड-19 मुळे मृत पावलेल्या मृतदेहाची धर्माचा रितीरिवाजा प्रमाणे शासन परिपत्रकात नमुद मार्गदर्शक सुचनाचे तंतोतंत पालन करुन योग्यरितीने प्रेतचे विल्हेवाट लावण्यात आले आहे. माणुसकीच्या दृष्टीकोणातून सदर संस्थेने केलेल्या काम अत्यंत मोलाचा आहे यामुळे समाजामध्ये सर्व धर्म समभावाचे संदेश जनमानसात पोहचण्याचे मौलाचे काम केले आहे.

करिता हॅप्पी क्लब, नांदेड या संस्थेकडून करण्यात येणारे उक्त काम हे अत्यंत कौतुकास्पद असल्यामुहे सदर संस्थेतील टिमचे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्कार करणे योग्य राहील.

**विषय क्रं. 08** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत ब्रम्हपुरी भागामध्ये मुलभूत सुविधांचे कामे प्रगतीपथावर आहेत. बिएसयुपी लाभार्थी हिस्सातुन झालेल्या कामाचे देयक अदाई करण्यासाठी मान्यता आहे. तथापि वसुली होईपर्यंत कामास उशीर होत आहे काम लवकर करणे आवश्यक आहे तसेच यापुर्वी शहरातील विविध भागात झालेली बिएसयुपी अंतर्गत कामे शासन निधी मधुन करण्यात आलेली आहे. या कामासाठी बिएसयुपी योजने अंतर्गत प्राप्त निधीचा व्याजेच्या रक्कमेतुन ब्रम्हपुरी भागातील मुलभुत सुविधांचे कामे केल्यास त्या भागातील नागरीकांना मुलभुत सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच सदर व्याजाची रक्कम खर्च करुन कामे पुर्ण करण्यात यावी लाभार्थी वसुली नंतर सदरची रक्कम परत या खात्यात जमा करुन घेण्यात यावी.

त्याकरिता बिएसयुपी योजने अंतर्गत प्राप्त निधीच्या व्याजेच्या रक्कमेतुन ब्रम्हपुरी भागातील मुलभुत सुविधांचे कामे करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- म. मसुद अहेमद खान म. उस्मान खान **अनुमोदक** :- स. शेर अली महेबुब अली

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी कार्यरत असतांना मृत्यु पावलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यास अनुकंपाचा लाभ देण्यासाठी प्रलंबीत असलेले प्रकरण निकाली काढणे बाबत.

**सुचक** :- अपर्णा नेरलकर **अनुमोदक** :- पुरी कौशल्या

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

नावाशमनपाकेच्या आस्थापनेवर पंप ऑपरेटर या अभिनामाची एकुण मजुर पदे 30 आहेत. सालसन 2014 मध्ये प्रमाणित केलेल्या बिंदुनामावली रजिस्टरमधील नोंदीनुसार सरळसेवा (18) व पदोन्नतीची (18) दर्शविण्यात आलेली आहेत. त्यानुसार पदोन्नतीने (09) पदे भरण्यात आलेली आहेत व (09) पदे रिक्त आहेत सदरील (09) रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रं. नामपा-2018/प्र.क्र.433/नवि-24 नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 14 फेब्रुवारी 2019 पत्राने मनपाला कळविले आहे. त्यानुसार मनपाचे पत्र जा.क्रं. नावाशमनपा/आस्था-5/10118/2019 दिनांक 13.03.2020 नुसार जर या (09) पदोन्नतीच्या पदावर संबंधीत पंप ऑपरेटर यांना सामावुन घ्यावयाचे असल्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी असे मा. उच्चन्यायालय, औरंगाबाद खंडपिठ यांना लेखी पत्र सादर केले आहे त्यानुसार सदर पदोन्नतीची (09) रिक्त पदे हि सरळसेवेमध्ये रुपांतरीत करुन सदर रिक्त पदावर एकत्रीत वेतनावर कार्यरत पंप ऑपरेटर यांना सेवेत सामावुन घेण्यास हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक** :- अब्दुल रशीद अब्दुल गणी **अनुमोदक** :- फारुख हुसेन कासीम पिरान

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

महानगरपालिका आस्थापनेवर सन 2009-10 मध्ये लाड पागे समितीच्या शिफारशी अंतर्गत सेवा निवृत्त व मयत सफाई कामगारांच्या पुढील 9 वारसदारांना **1) भगवान गंगाराम जोंधळे, 2) राजू कचरु करडे, 3) साहेबराव विठ्ठलराव जोंधळे, 4) किशन अर्जुनराव वाघमारे, 5) नितीन झरीबा कांबळे, 6) अचना दत्ता जोंधळे, 7) रेखा पुंडलीक गजभारे, 8) राहूल यादवराव कांबळे व 9) महेश चंद्रकांत जोंधळे यांना** सफाई कामगार ऐवजी लिपीक या पदावर नियुक्ती दिलेली आहे.

तथापी, मनपा आस्थापनेवर कार्यरत कर्मचारी **श्री सुमेध भगवानराव बनसोडे** यांनी वरील कर्मचाऱ्यांप्रमाणेच पूर्वलक्षीप्रभावाने लिपीक संवर्गात सुधारीत नियुक्ती करण्याची मागणी मनपा प्रशासन व शासनाकडे केलेली होती.

तसेच दरम्यानच्या काळात, श्री बनसोडे यांनी याच मागणीसाठी मा. आयुक्त, मनपा, नांदेड यांचेविरुद्ध **स.औद्योगिक न्यायालयात** युएलपी याचिका दाखल केली, त्याचा निर्णय दि.08.02.2019 रोजी पारित झाला आहे. सदर याचिका मा. न्यायालयाने अंशतः मंजूर **(Partly Allowed)** केली आहे.

या प्रकरणात शासन स्तरावरुन दिनांक 28 जानेवारी 2020 रोजीच्या या नियुक्तीच्या अनियमितते प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करणेसाठी 3 मुद्यांचा समावेश आहे. याबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मुद्दा क्र.03 नुसार यात समाविष्ट 9 कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रकरणी त्यांची सेवा पुढील तारखेपर्यंत जैसे थे ठेवण्याबाबत आदेश पारीत केले असुन याशिवाय संबंधीतांच्या सेवे व्यतिरीक्त अन्य कोणत्याही मुद्दया बाबत स.न्यायालयाचे निर्बंध नाहीत. सदरील मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील याचिकेत श्री बनसोडे यांनी हस्तक्षेप याचिका दाखल केलेली आहे.

तथापी, प्रस्तुत प्रकरणी स.औद्योगिक न्यायालयीन निर्णयाचे अवलोकन केले असता स.न्यायालयाने श्री बनसोडे यांची याचिका **अशंतः मान्य** केली असुन संबंधीत कर्मचाऱ्याने वर्ग-4 संवर्गातील मुळ नियुक्ती असतांना सुध्दा नियुक्तीच्या दिनांकापासुन वर्ग-3 संवर्गातील लिपीक या पदाचे कर्तव्य बजावल्याचे सबळ पुराव्या आधारे स.न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्टपणे नमुद केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता लिपीक पदासाठी शासनाने निर्धारीत केलेली किमान अर्हता ही श्री बनसोडे धारण करीत असल्यामुळे तसेच ते त्यांच्या पूर्वीच्या नियुक्तीच्या दिनांकास लिपीक पदासाठी पात्र ठरत होते.

तसेच श्री बनसाडे यांच्या औद्योगिक न्यायालयातील याचिकेत नमुद ईतर 9 कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारीत नियुक्ती देण्याच्या मागणीचा विचार करता श्री बनसोडे व ईतर 9 कर्मचारी यांच्या नियुक्तीची पध्दत, अर्हता व ईतर सर्व बाबी सारख्याच असुन श्री बनसोडे हे ईतर 9 कर्मचाऱ्यांपेक्षा सेवाजेष्ठ असल्याने तसेच तत्कालीन आयुक्त महोदयांनी घेतलेल्या तत्वतः व धोरणात्मक निर्णयानुसार त्याच पध्दतीचे धोरण अवलंबून नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोणातुन त्यांच्यावर झालेला अन्याय पाहता सदरील नियुक्ती प्रक्रियेतील अनियमितता दुर करण्याच्या हेतुने श्री बनसोडे यांना त्यांनी मागील 13 वर्षातील बजावलेली सचोटीची सेवा, नियुक्तीपासुन लिपीक संवर्गातील कामाचा दिर्घ अनुभव व त्यांचे उत्कृष्ट व उल्लेखनीय असे कार्य विचारात घेऊन त्यांना आजमितीस प्रस्तुत प्रकरणात मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबित असलेल्या याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन पूर्वलक्षी प्रभावाने लिपीक संवर्गात नियुक्ती बाबतचे सुधारीत आदेश निर्गमित करुन त्यानुसार सेवा जेष्ठता, वेतन निश्चिती व ईतर सर्व सेवा विषयक लाभ बहाल करण्यास ही सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- दुष्यंत सोनाळे **अनुमोदक** :- सौ. गितांजली हाटकर (कापुरे), ज्योत्सना राजु गोडबोले, अ. लतीफ अ. मजीद

**विषय क्रं. 12** **प्रस्ताव**

नादेड वाघाळा शहर महानगरपरालिका हद्यीत लोकशाहीर अन्नाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत कामे मंजुर करणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- दुष्यंत सोनाळे, आनंद चव्हाण

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील देगलुर नाका भागात ट्रेचिंग ग्राऊंड जागेवर असलेला कचरा प्रोसेसिंग करण्यासाठी शासना मार्फत निधी प्राप्त करणे बाबत.

**सुचक** :- म. मसुद अहेमद खान उस्मान खान **अनुमोदक** :- सय्यद शेर अली, सौ. गितांजली (कापुरे) हटकर

**विषय क्रं. 14** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील पाणी पुरवठा व्यवस्था बळकटीकरण करणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 15** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अर्धवट असलेले मार्केट चे काम पुर्णत्वास नेणे बाबत.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक :-** शबाना बेगम मो. नासेर

**विषय क्रं. 16** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्याच्या चौकातील राहदारीस अडथळे येणारे पोल व इतर साहित्य शिफट करुन रस्ते सुरळीत करण्यासाठी योग्यती कार्यवाही करणे बाबत.

**सुचक :-** नागनाथ दत्तात्रय गड्डम **अनुमोदक :-** दुष्यंत सोनाळे

**विषय क्रं.** 17 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील गुरुव्दारा चौरस्ता व देगलुर नाका येथील असलेला फुटओव्हर ब्रिज हे रेल्वे विभागास हस्तांतरण करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक :-** प्रकाशकौर सुरजीतसिंघ खालसा **अनुमोदक :-** भानुसिंह रावत

**विषय क्रं.** 18 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील तृतीयपंथी यांच्यासाठी दफनभुमी/स्मशानभुमिसाठी जागा निश्चित करण्यासाठी चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- तेहरा अमितसिंह

**विषय क्रं.** 19 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपिालका हद्यरीतील विविध भागातील विकास कामासाठी जिल्हा नियोजन, राज्य शासन व केंद्र शासनाचे विविध योजनेमुळे विकास कामासाठी निधी मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- किशोर स्वामी

**विषय क्रं.** 20 **प्रस्ताव**

नांदेड शहरातील कोरोनाच्या काळात शहरातील नागरीकांचा आरोग्य सुविधेसाठी पंजाब भवन व NRI निवासचा वापर करण्यात आला आहे त्या इमारतीचे अंतर्गत सुविधा, नुतनीकरण महानगरपालिके तर्फे करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- तेहरा अमितसिंह **अनुमोदक** :- नवाब गुरमितसिंघ

**विषय क्रं.** 21 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील नगरोत्थान, अमृत योजनेचे शिल्लक कामे पुर्ण करणे बाबत

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- किशोर स्वामी

**विषय क्रं.** 22 **प्रस्ताव**

शहरातील नालेचा सांडपाण्याचा पुर्नरवापर करणे बाबत

**सुचक :-** स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक :-** अ. सत्तार अ. गफुर

**विषय क्रं.** 23 **प्रस्ताव**

कोरानामुळे शहरात 22 मार्च 20 पासुन लॉकडान लागल्यामुळे शहरातील नागरीकांनी आपले मालमत्ता कर व पाणी पट्टी कर भरललेली नसल्यामुळे त्यामुळे महापालिकेस वसुली झालेली नसल्याकारणाने नागरीकांचे मालमत्ता कर व पाणी पट्टी करावर लावण्यात आलेली शास्ती माफ करणे बाबत.

**सुचक :-** स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक :-** अ. सत्तार अ. गफुर

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)** **नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**